अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

शुक्रवार, दि. २६ ऑगस्ट २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३२७ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई; दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर** : राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील स्वागत नगर येथे एका ऑटो रिक्षा मधून ११० लिटर हातभट्टी दारुची वाहतूक होताना आढळून आल्याने गुन्हा नोंदविला आहे.

शहरातील ताई चौक ते स्वागत नगर या परिसरात पाळत ठेवली असता त्यांना एका बजाज कंपनीच्या ऑटो रिक्षा क्रमांक एम.एच.१३.बीव्ही.११७१ मधून हातभट्टीची वाहतूक होत असताना आढळून आल्याने त्यांनी रिक्षा थांबवून तपासणी केली असता त्यात प्लास्टिकच्या कॅनमधून एकूण ११० लिटर हातभट्टी दारू मिळून आली.

गुन्ह्यातील ऑटो रिक्षा चालक हा जागेवरून पळून गेला असून वाहनात बसलेला वाहतूकदार हणमंतू नरेंद्र गुंडेटी, (वय-३४,रा.अंबिका नगर,सोलापूर) यास अटक करण्यात आली असून त्याचे विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून त्याच्या ताब्यातून ऑटो रिक्षा व ११० लिटर भट्टी दारू असा एकूण १ लाख ३१ हजार पन्नास रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.फरार ऑटो चालकाचा शोध घेण्यात येत आहे.

## सोलापुरात आयकर विभागाच्या धाडी

# पकडली नामवंत हृदयरोगतज्ज्ञांची नाडी, तपासली कारखान्याच्या साखरेतील गोडी

सुराज्य/सोलापूर

**कृषी अभ्यास शिबिराचे स्टिकर्स लावलेल्या जिल्ह्याबाहेरचे पासिंग असणाऱ्या गाड्यांचा ताफा, सोबत बाहेरच्याच पोलिसांचा तगडा बंदोबस्त, गुरुवारची सकाळ उजाडण्यापूर्वीच हा ताफा सोलापूर शहर आणि जिल्ह्यात विविध ठिकाणी पोहचला. त्यानंतर घरी येणारे वृत्तपत्र आणि सकाळचा चहापाठोपाठ सोलापुरात आयकर विभागाच्या धाडी पडल्याची ब्रेकिंग न्यूज धडकली. या पथकाने शहरातील नामवंत हृदयरोगतज्ज्ञांच्या कमाईची नाडी आणि जिल्ह्यात नव्यानेच उदयास आलेल्या साखर सम्राटाच्या कारखान्यातील साखरेची गोडी तपासण्याचे काम गुरूवारी दिवसभर सुरू असल्याचे पाहण्यास मिळाले.**

आयकर विभागाच्या पथकातील काही गाड्या सात रस्ता परिसरात घुसल्या. काही गाड्या अश्विनी हॉस्पिटलच्या फाटकातून आत शिरल्या. काही गाड्या सातरस्ता परिसरातीलच मेहुल कन्स्ट्रक्शनच्या कार्यालयासमोर जाऊन थांबल्या. त्याचवेळी काही गाड्या सातरस्ता परिसरातीलच शासकीय विश्रामगृहाच्या पाठीमागील स्पंदन हॉस्पिटलच्या फाटकासमोर थांबल्या. सातरस्ता परिसरात या गाड्या पोचत असताना दुसरीकडे काही गाड्या अक्कलकोट रस्त्यावरील कुंभारी येथील अश्विनी हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेजच्या फाटकातून आत घुसल्या. शिवाय काही गाड्या होटगी रस्त्यावरील रघोजी हॉस्पिटलच्या कॅन्टिनसमोरच जाऊन थांबल्या. काही गाड्या सोन्या मारुतीजवळच्या छोट्याशा बोळातही घुसगाड्यांमधील अधिकारी आणि कर्मचारी उतरले. सोबत बाहेरून आलेल्या पोलीस पथकही दिमतीला होते. या अधिकाऱ्यांनी थेट संबंधितांच्या कार्यालयांचा ताबा घेतला. कार्यालयातील लोक कार्यालयातच राहिले. बाहेरच लोक बाहेरच थांबले. दिवसभर या पथकाने विविध कागदपत्रे तपासली. काही कागदपत्रे ताब्यातही घेतली. रात्री उशिरापर्यंत ही तपासणी मोहीम चालूच होती. प्रत्यक्षात मात्र धाडीत काय सापडले? काही आक्षेपार्ह कागदपत्रे सापडली का? याची कोणतीच माहिती अधिकृतपणे सांगण्यात आली नाही.

### नो... नो... फोन कट

डॉ. अनुपम शहा यांच्याकडे त्यांच्या क्लिनिकवर पडलेल्या आयकर विभागाच्या धाडीसंदर्भात विचारणा केली असता त्यांनी 'नो... नो... म्हणत फोन कट केला. त्यामुळे त्यांच्याकडील कोणतीच माहिती समजू शकली नाही.

### डॉ. परळे बाहेरगावी

डॉ. गुरुनाथ परळे यांच्या स्पंदन हार्ट केअर हॉस्पिटलवरही धाड पडल्याचे वृत्त आहे. याबाबत डॉ. परळे यांना विचारणा केली असता 'माझे सासरे मयत झाल्याने मी बाहेरगावी आहे...' असे सांगत त्यांनी अधिक माहिती देण्यास नकार दिला.

### धवल शहा नॉटरिचेबल

मेहुल कन्स्ट्रक्शनवर पडलेल्या धाडीसंदार्भात धवल पटेल यांना संपर्क साधला असता त्यांचा मोबाईल नॉट रिचेबल लागला. त्यामुळे त्यांच्याकडील धाडीसंदर्भात अधिक माहिती मिळू शकली नाही.



### याठिकाणी झाली तपासणी

मेहुल कन्स्ट्रक्शन, अश्विनी हॉस्पिटल, अश्विनी हॉस्पिटल व वैद्यकीय महाविद्यालय (कुंभारी), बिपीनभाई पटेल यांचे निवासस्थान, डॉ. गुरुनाथ परळे यांचे स्पंदन हार्ट केअर हॉस्पिटल, डॉ. अनुपम शहा यांचे हार्ट क्लिनिक, डॉ. विजयकुमार रघोजी यांचे रघोजी किडनी आणि मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल याठिकाणी आयकर विभागाने छापा टाकून तपासणी सुरू केली आहे. रात्री उशिरापर्यंत झाडाझडती चालू होती. महत्त्वाची कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत. मालमत्ता आणि उत्पन्नाचे मार्ग यांची कसून तपासणी केली आहे. काही पथकांनी रात्री धाड घातलेल्या घरी मुक्काम केल्याचे वृत्त आहे.

## अभिजित पाटील यांचे निवासस्थान व कार्यालयांवर छापा

**पंढरपूर** : येथील विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांच्या येथील कार्यालय, निवासस्थानी तसेच उस्मानाबाद येथील धाराशिव साखर कारखान्याच्या कार्यालयावर आयकर विभागाने एकाचवेळी छापा टाकून तपासणी सुरू केली आहे. यासंदर्भात अभिजित पाटील यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

कारखाना चालविणारा माणूस म्हणून अभिजित पाटील यांची ओळख आहे. डीव्हीपी उद्योग समूहाच्या माध्यमातून त्यांनी उस्मानाबाद, नाशिक व नांदेड , सांगोला, बीड येथे साखर कारखाने चालविण्यास घेतले आहेत. तसेच १२ वर्षापासून बंद असलेला सांगोला कारखाना देखील यंदा सुरू केला. तालुक्यातील सर्वात मोठ्या श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची निवडणूक जिंकल्यामुळे सहा साखर कारखाने त्यांच्या ताब्यात आहेत. अल्पावधीत पाटील यांनी हा पल्ला गाठला.



दरम्यान गुरूवारी पहाटे साडे सहा वाजता तीन गाड्यांमधून आलेल्या आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी येथील बाजार समितीनजीक असलेल्या पाटील यांच्या कार्यालयावर छापा टाकला. तसेच त्यांच्या निवासस्थानी देखील अधिकाऱ्यांनी तपासणी सुरू केली होती. उस्मानाबाद येथील साखर कारखान्याच्या कार्यालयावर देखील याचवेळी छापा पडला असल्याची माहिती आहे. पाटील यांच्या पंढरपूर येथील कार्यालयातूनच कारखान्यासह इतर व्यवसायाचा कारभार चालतो. रात्री उशिरा पर्यंत कागदपत्रांची तपासणी व चौकशी सुरू होती. याबाबत माहिती घेण्यासाठी अभिजित पाटील यांच्याशी संपर्क केला असता त्यांचा मोबाईल बंद लागला.

## पंढरपूरजवळ एसटी बस आणि ट्रकचा अपघात; महिलेचा जागीच मृत्यू

**पंढरपूर** : सोनके (ता. पंढरपूर) गावा नजीक एसटी बस आणि माल वाहतूक ट्रकचा आज सकाळी भीषण अपघात झाला. या अपघातात बस मधील सुंदराबाई माने (वय: ६९ रा.फळवणी ता.माळशिरस) या महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे तर तीन जन जखमी झाले आहेत.



सकाळी ११च्या सुमारास पंढरपूरहून आटपाडी कडे जाणारी बस आणि कराडकडून पंढरपूरकडे भंगार घेऊन येणाऱ्या ट्रकची सामोरा समोर धडक झाल्याने अपघात झाला. यामध्ये सुंदराबाई माने या महिलेचा जागीच मृत्यू झाला. प्रवासी शंकर शिवशेटे, बस चालक आनंदराव पाटील, बस वाहक राजेंद्र गायकवाड हे जखमी झाले आहेत. अपघाताची नोंद पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. आटपाडी आगाराची बस पंढरपूर हून सांगलीकडे जात असताना ओव्हर टेक करताना हा भीषण अपघात झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या अपघाताची नोंद पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

सिद्धेश्वर चिमणी प्रकरण

## महापालिका आयुक्त घेणार ७ सप्टेंबरला सुनावणी

सुराज्य/सोलापूर

कुमठे येथील सिद्धेश्वर साखर कारखाना चिमणी प्रकरणी डीजीसीएच्या निर्णयानंतर ७ सप्टेंबर रोजी कारखान्याची सुनावणी महापालिका घेणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त शिवशंकर यांनी दिली



महापालिकेच्या वतीने गुरूवारी शिवशंकर यांचे सिद्धेश्वर साखर कारखान्याची सुनावणी घेण्याचे नियोजन होते मात्र तत्पूर्वी महापालिका आयुक्तांनी डीजीसी विचारणा केली तेव्हा डीजीसीए ३१ ऑगस्टपर्यंत कारखान्याला मुदत दिल्याची माहिती मिळाली. ते आदेश देतील त्यानंतर सोलापूर महापालिका आयुक्त ७ सप्टेंबर रोजी महापालिकेत कारखान्याची सुनावणी घेणार आहेत. दरम्यान, डीजीसीएचा अहवाल आम्हाला मिळाला नाही, कारखान्याला कसा मिळाला हे माहिती नाही, तसा अहवाल दिला जात नाही, असे आयुक्त म्हणाले.

## आमदार ताईंनी खरेदी केल्या रानभाज्या, अधिकाऱ्यांनी मारला जेवणावर ताव

### जिल्हा परिषदेच्यावतीने रानभाज्या व खाद्य महोत्सव थाटात साजरा

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या आवारात आयोजित रानभाज्या महोत्सवात आमदार प्रणिती शिंदे यांनी घोळ व इतर भाज्या खरेदी केल्या. तर महिला बचत गटांनी फोडणी देऊन बनविलेल्या रानभाज्या व कडक ज्वारीच्या भाकरी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदिप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शितलकुमार जाधव तसेच जि. प. च्या विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी ताव मारला.

जिल्हा परिषदेच्या आवारात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत रानभाज्या व खाद्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात सोलापूरच्या ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी या ठिकाणी रानभाज्यांची दुकाने थाटली होती. या महोत्सवाला आमदार प्रणिती शिंदे यांनी हजेरी लावत घोळची भाजी व पालकची पेंडी खरेदी केली. यावेळी जिल्हा परिषदेचे सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. रानभाज्या महोत्सवात २ दिवसात एकुण २९ बचतगटांनी सहभाग घेतला. २९ स्टॉलवर २ लाख ६८ हजार ५८९ रूपयांची उलाढाल झाली.



### महिला, शेतकऱ्यांना व्यासपीठ उपलब्ध

महिला व गावोगावच्या शेतकऱ्यांना या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होत आहे. एका दिवसात एक लाख रूपयांच्या भाज्यांची विक्री झाली. धपाटे, भाकऱ्या, थालीपीठ, पिठलं, ठेचा, तांदुळशाची भाजी येथे बनवली जात आहेत. महिला व शेतकऱ्यांच्या व्यवसायाला चालना मिळत आहे. सोलापूरकरांना स्वादीष्ठ खायला मिळाले आहे, अशी भावना आमदार प्रणिती शिंदे यांनी व्यक्त केली.

### रानभाज्या अमृतापेक्षा कमी नाहीत

पावसाळ्यात निसर्गतः उगवून येणाऱ्या रानभाज्या अमृतापेक्षा कमी नाहीत. त्यामुळे रानभाज्यांची ओळख करून घ्या व निरोगी आरोग्यासाठी त्यांचे मुबलक प्रमाणात सेवन करा, असे आवाहन सीईओ दिलीप स्वामी यांनी यावेळी केले.

### महोत्सवात या रानभाज्यांची हजेरी

कडवंची, तांदुळसा, कडवंची, चिगळ, शेपू, आंबाडा, पालक, राजगिरा, चंदन बटवा, राजगिरा, कडवंची, तांदुळसा, हादगा, पाथर, माठ, सरांठा, रान करडा, नाई पाला, कोळसा भाजी या गावरान भाज्या होत्या. या भाज्या खरेदी करण्यासाठी बघण्यासाठीही नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

## बंजारा सोसायटीत आत्महत्येचा प्रयत्न; फासातून सोडवल्याने अनर्थ टळला

**सोलापूर** : विजापूर रोडवरील आरटीओ कार्यालयाजवळ असलेल्या बंजारा सोसायटीत एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याला त्वरित फासातून सोडवून शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही घटना आज गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली.

किरण हरिचंद्र पवार (वय २७ मूळ रा. बॅगेहळ्ळी ता.अक्कलकोट सध्या रा. बंजारा सोसायटी आरटीओ कार्यालयाजवळ) असे जखमीचे नाव आहे. त्याने आज सकाळी ११ वाजेच्या सुमारास राहत्या घरातील छताच्या पंख्याला ओढणीने गळफास घेतला होता. याची माहिती मिळतात आजूबाजूच्या लोकांनी दरवाजा उघडून त्याला फासातून सोडवले. त्यानंतर त्याला शासकिय रुग्णालयात दाखल केले. त्याने हा प्रकार का केला हे अद्याप समजले नाही. विजापूर नाका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## शेतजमिनीच्या वाटणीवरुन झोपेत असलेल्या सख्या भावावर हल्ला; दोघांवर गुन्हा

सुराज्य/बार्शी

शेत जमिनीच्या वाटणीच्या बाबत तू कोर्टात का गेला? या कारणावरून झोपेत असलेल्या सख्ख्या भावावर लोखंडी अँगलने हल्ला करून गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना दहिटणे (ता.बार्शी) येथे बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली.

प्रवीण चंद्रकांत काशीद (वय ३६ रा. दहिटणे) असे जखमीचे नाव आहे. त्यांना मारहाण करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी त्यांचा भाऊ हरिदास काशीद आणि तुकाराम दत्तात्रय साठे (दोघे रा. दहिटणे)या दोघांवर वैरागच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला.



जखमी प्रवीण काशीद हे आपल्या शेतातील वस्तीवर झोपले होते. पहाटे दोन वाजेच्या सुमारास हरिदास काशीद आणि तुकाराम साठे या दोघांनी शेतीचा वाद कोर्टात का घेऊन गेला. या कारणावरून त्याच्यावर लोखंडी अँगलने हल्ला करून हात फ्रॅक्चर केला. तसेच आई लता काशीद यांना शिवीगाळ आणि धमकी दिली. अशी नोंद पोलिसात झाली. सहाय्यक फौजदार हळे पुढील तपास करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मला जिल्हा परिषदेच्या शाळेत का नाही घातले?

कल्याण

569-07-278

मेन बाजार

133-79-900

# कविमनाच्या मुख्यमंत्र्यांनी पुन्हा मने जुळवली....

**मुंबई** : विधी मंडळाच्या अधिवशेनाची गुरूवारी सांगता झाली. बुधवारी झालेल्या गोंधळाने अधिवेशनाला गालबोट लागले. शेवटच्या दिवशाही पायऱ्यांवर धुसपूस झाली. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी पुन्हा झडल्या. मात्र विधानसभेत जेव्हा कामकाज सुरू झाले तेव्हा मात्र राजकिय वातावरण एकदम टेन्शन फ्री झाले. त्याला कारण ठरले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कविमन. जाता जाता विरोधकांच्या सर्व प्रश्नांना उत्तरे देताना शिंदे यांनी खोपरखळ्या मारल्या. खुमासदार शैलीत चिमटहेही काढले. वेळ संपली तेव्हा शिंदे यांनी आपले कविमन सभागृहाला दाखवून दिले.त्यांनी सादर केलेल्या काव्यपक्तींने सत्ताधारी व विरोधक यांची मने पुन्हा जुळली.



आम्ही बाळासाहेबांच्या विचाराशी कधीही गद्दारी केली नाही. आम्ही बाळासाहेबांचे विचार पुढे नेत आहेत. असंगांशी संग करण्यापेक्षा मी कंत्राटी मुख्यमंत्री म्हणून कधीही बरा, असे म्हणत शिंदे यांनी तुम्ही ( उद्धव ठाकरे ) केंद्रीय मंत्री नारायण राणेंना जेवणाच्या ताटावरून उठवले आणि जेलमध्ये टाकले, असा उद्धव ठाकरें आणि विरोधी पक्षांना टोला लगावला. शिंदे यांनी नीती आयोगाच्या बैठकीत तिसऱ्या रांगेत उभे करण्यावरून विरोधक करत असलेल्या टीकेला उत्तर दिले. नीती आयोगाच्या बैठकीला गेलो होतो. त्यावेळी मी त्या ठिकाणी अनेक मुद्दे मांडले. मात्र, मी मागे तिसऱ्या रांगेत उभा होतो त्यावरुन विरोधकांनी टीका केली.

### ▪ अन् खसखस पिकली...

नगराध्यक्षपदाची निवड थेट जनतेतून करण्याच्या निर्णयाला विधानसभेत २२ ऑगस्ट रोजी मंजुरी मिळाली. यावेळी विधानसभेत विरोधकांनी गोंधळ घातला. सरकारच्या या निर्णयाला विरोध केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री शिंदे यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून योजना राबवत असल्याचा आरोप विरोधकांनी त्यांच्यावर केला. तेव्हा दोन ओळी सादर करून एकनाथ शिंदे यांनी विधानसभेतील वातावरण हलके फुलके केले. 'देवेंद्र और में है साथ साथ, मेरा नाम है एकनाथ' असे एकनाथ शिंदेंनी म्हटल्यानंतर विधानसभेत एकच खसखस पिकली.

### ▪ सभागृहामध्ये एकच हशा पिकला

शिंदे यांनी सादर केलेल्या या आठ ओळींच्या कवितेमध्ये शेवटच्या दोन ओळींमध्ये पवार यांचा उल्लेख आहे. पहिल्या सहा ओळी म्हणून झाल्यानंतर शिंदे थोडे थांबले. त्यानंतर त्यांनी शेजारी बसलेल्या फडणवीसांकडे पाहून, 'हे नको ना?' असे विचारले. त्यावर शिंदे यांच्या मागे बसलेल्या एका आमदाराने, वाचा वाचा असे म्हटले. दरम्यान, शेवटची ओळ वाचावी की वाचू नये या संभ्रमात असताना शिंदे यांनी कवितेची शेवटची ओळ म्हटली आणि सभागृहामध्ये एकच हशा पिकला.

### मुख्यमंत्र्यांनी अजित पवारांवर सादर केलेली कविता

किती संकटं येऊ द्या
आपण सर्व एकत्र येऊ या

कशाला करायचे राजकारण
आपला उद्देश समाजकारण

एकमेकांना सहाय्य करुया
महाराष्ट्राला पुढे नेऊया

थांबवा आता शब्दांचे वार
आमचे मित्र अजित पवार